# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था टोगलापूर यांना धर्मशाळा सुरु करण्यास मंजूरी देण्याबाबत

**(१) २०४४३ (१७-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती तथा उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर येथे उपचारार्थ येणाऱ्या रुग्णांच्या भोजन व निवास व्यवस्थेकरीता मुंबईतील गाडगेबाबा धर्मशाळेच्या धर्तीवर सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था टोगलापूर, फाटा मासाद यांना धर्मशाळा सुरु करण्यास मंजूरी देण्याबाबत दिनांक २८ मे, २०१५ रोजी शासनास पत्र लिहून निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०६-२०१८) :** (१) सदरहू निवेदन शासनास प्राप्त झाले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### उस्मानाबाद जिल्हयातील महसूल, आरोग्य विभाग व जिल्हा परिषदेमधील रिक्त पदे भरणेबाबत

**(२) ३९३५३ (२१-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात महसूल, आरोग्य विभाग व जिल्हा परिषदेमधील अनेक पदे रिक्त असल्यामुळे कामाचे योग्य नियोजन करणे व दुष्काळासंबंधित उपाययोजना राबविणे शक्य होत नसल्याने सदर रिक्त पदे तात्काळ भरणेबाबत मा.मुख्यमंत्री यांना लोकप्रतीनिधिनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात भिषण दुष्काळी परिस्थिती असून दुष्काळ निवारणाच्या कामाला शासनाकडून निधी उपलब्ध नसल्याने तसेच अपुरे कर्मचारी व रिक्त पदामुळे अनेक कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सर्व रिक्त पदे तातडीने भरणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०८-२०१८) :** (१) होय.
(२) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात उस्मानाबाद जिल्ह्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शासनाने विविध बाबींसाठी एकूण रु.३६९९७.६२/- लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन दिला होता व त्या त्या प्रयोजनासाठी खर्च करण्यात आला आहे.
उस्मानाबाद जिल्ह्यात अपुरे कर्मचारी व रिक्त पदाअभावी नैसर्गिक आपत्ती व टंचाई निवारणाचे कोणतेही काम प्रलंबित नाही.
(३) उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध सेवेतील बहुतांश आवश्यक असलेली रिक्त पदे त्या त्या वेळी भरण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना भूमिधारी हक्काने दिलेल्या शेतजमिनी वर्ग १ मध्ये रुपांतरीत करण्याबाबत**

**(३) ६२०२९ (१९-०८-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट जमीन महसूल अधिनियम १९६६ पूर्वी मध्यप्रदेश जमीन महसूल संहिता १९५४ नुसार शेतकऱ्यांना भूमिधारी हक्काने दिलेल्या शेतजमिनी वर्ग १ मध्ये रुपांतरीत करावयाच्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास या कायद्यानुसार विदर्भातील शेतकऱ्यांना काही प्रमाणात याचा लाभ मिळाला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील भूमिस्वामी शेतकऱ्यांना येथील अधिकाऱ्यांच्या कामचुकार धोरणामुळे लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कामचुकार अधिकारी यांच्यावर कारवाई करुन गडचिरोली जिल्हयातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०५-२०१८) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २९ (२) (सी) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (विविक्षित भूमीधारकांना भोगवटदार वर्ग-१ मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम १९६८ मधील तरतुदीस अनुलक्षून विदर्भातील अनिर्बंधित भूमीधारी (भोगवटदार वर्ग-२) शेतकऱ्यांना भूमीस्वामी (भोगवटदार वर्ग-१) मध्ये परिवर्तित करण्याबाबत शासनाने दि. २ जानेवारी, २०१२ रोजीच्या परिपत्रकान्वये आवश्यक निर्देश निर्गमित केले आहेत. त्यानुसार गडचिरोली व विदर्भातील इतर जिल्ह्यात प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये प्रकरणपरत्वे क्षेत्रिय पातळीवर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील १४ गावांचा सीमा प्रश्न सोडविण्याबाबत**

**(४) ६६७३६ (१०-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील १४ गावांचा सीमा वादाचा प्रश्न सुटत नसल्याने दोन्ही राज्याची विकास यंत्रणा काम करीत असतांनाही आरोग्य सेवा व इतर मूलभूत सोयीसुविधा या गावांना मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांचा सीमा प्रश्नाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०८-२०१८) :** (१) जिवती तालुक्यात महाराष्ट्र शासनातर्फे आरोग्य सेवा, रस्ते, विद्युत पुरवठा व इतर मुलभुत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत, तसेच विविध योजना राबविण्यात येत आहेत. या तालुक्याचा मानव विकास निर्देशांक कमी असल्याने विविध योजनांचा आराखडा तयार करण्यात येत आहे.

(२) व (३) महाराष्ट्र व आंध्रप्रदेश आंतरराज्य सीमेवरील वादग्रस्त असलेले चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील १) परमडोली २) कोठा बु. ३) लेंडीगुडा ४) मुकदमगुडा ५) महाराजगुडा ६) अंतापूर ७) पळसगुडा व ८) मेसापूर याप्रमाणे राजपत्रामध्ये नमूद टोले व वाड्या समाविष्ट करुन दि. १ डिसेंबर १९९८ पासून सदर गावांना महसुली दर्जा देण्यात आला आहे.

---

**धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) येथील उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालयाच्या बांधकामाकरिता निधी देण्याबाबत**

**(५) ८१७०८ (१२-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव रेल्वे (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) येथील उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयाची इमारत बांधण्याकरिता तहसील कार्यालयाच्या दुसऱ्या माळ्यावरील जागा जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१४ चे आदेशानुसार मंजुर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कार्यालयाच्या इमारत बांधकामाचा प्रस्ताव अंदाजपत्रकासह शासनास सादर करून निधी मागणी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी अधिक्षक भुमी अभिलेख, अमरावती यांना लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार उक्त प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, उक्त कार्यालयाच्या इमारत बांधणी प्रस्तावास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती दि.०६ एप्रिल, २०१६ रोजीच्या पत्रासमवेत उक्त बांधकामाबाबतचा रु.६७,०६,४००/- खर्चाचा प्रस्ताव या विभागास प्राप्त झाला असून सदर बांधकामास महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. बीएलडी-२०१६/प्र.क्र.२४२/ई-८, दि.२१ नोव्हेंबर, २०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर बांधकामास विधानमंडळाच्या दुस-या (पावसाळी) अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल.

---

## मौजे हिवरा बु. (ता.नांदगाव ख., जि.अमरावती) येथील शासकीय जमीन स्मशानभुमी करिता मिळणेबाबत

**(६) ८१८०८ (१२-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे हिवरा बु. (ता.नांदगाव ख., जि.अमरावती) येथील सर्वे न. ४ मधील क्षेत्र १.१२ हे. आर. ही शासकीय जमीन हिंदु व आदीवासी स्मशानभुमीकरिता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधीनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर जमीन हिंदु व आदीवासी स्मशानभुमी करिता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८)** : (१), (२), (३) व (४) मौजे हिवरा बु., ता.नांदगाव खंडेश्वर येथील सर्व्हे नं. ४ मधील क्षेत्र १.९२ हे.आर शासकीय जमीन हिंदु व आदिवासी स्मशानभुमीकरीता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१/१२/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी कार्यवाही केली असून सदरहू जमिनीचा आगाऊ ताबा हिंदु व आदीवासी स्मशानभुमीकरीता प्रदान करण्याबाबत दि.३१/०१/२०१८ रोजी जिल्हाधिका-यांकडून आदेश करण्यात आला आहे.

---

**उर्से ते खेड-शिवापूर (जि.पुणे) या १०० किलोमीटर मार्गाला राज्य मार्गाचा दर्जा दिल्याबाबत**

**(७) ८२३३८ (१२-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील रिंगरोडला शासनाने विशेष राज्यमार्गाचा दर्जा दिला असुन महाराष्ट्र महामार्ग अधिनियमातंर्गत याच्या पहिल्या टप्प्यातील उर्से-खेड-शिवापूर या १०० किलोमीटर मार्गाची अधिसूचना जाहीर करण्यात आल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिंगरोडच्या कामाला तातडीने सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०१८)** : (१) होय, हे खरे आहे.

(२) नगर विकास विभाग, शासन आदेश, दि.०५.०४.२०१७ अन्वये सचिव समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीच्या शिफारशीप्रमाणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रस्तावित चक्राकार मार्गाच्या आखणीसंदर्भात शिफारशी विचारात घेऊन सुधारीत आखणीप्रमाणे सर्व्हेक्षण व प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सचिव स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे पुणे चक्राकार मार्गाच्या पूर्व भागाचा रस्ता हा पुरंदर विमानतळाजवळून जाईल अशी आखणी करावयाची आहे. तथापि, त्यासाठी फेर सर्व्हेक्षण करणे गरजेचे आहे. परंतु सर्व्हेक्षणाच्या ठिकाणी झालेल्या मारहाणीच्या घटना विचारात घेऊन पोलीस संरक्षणाअंतर्गत नव्याने सर्व्हेक्षण करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर व जळकोट (जि.लातूर) तालुक्यात तलाठी सज्जा बांधण्याबाबत**

**(८) ८२४३७ (१२-०४-२०१७). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने तालुक्याच्या ठिकाणी तलाठी सज्जा बांधकामास मंजूरी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उदगीर व जळकोट (जि.लातूर) या तालुक्यातील तलाठी सज्जा बांधकामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने उदगीर व जळकोट तालुक्यात स्वतंत्र तलाठी सज्जा बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०५-२०१८) :** (१) व (२) उदगीर व जळकोट (जि.लातूर) या तालुक्यातील तलाठी सज्जा बांधकामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे, जुलै २०१६ पत्रान्वये शासनाकडे मागणी केली आहे.
जिल्हाधिकारी यांचेमार्फत सादर करण्यात आलेल्या तलाठी सज्जा बांधकामाचे प्रस्तावांना महसूल विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येते.
(३) व (४) उदगीर व तालुक्यातील ४० व जळकोट तालुक्यातील ११ तलाठी सज्जा बांधकामाकरीता शासकीय जागा उपलब्धतेबाबतची माहिती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर-२ यांना जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडून देण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केलेली अंदाजपत्रके व नकाशे जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांचेमार्फत शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

### मुंबई-पुणे द्रुतगतीमार्ग व मुंबईतील पाच एंट्री पॉईंट वरील टोलनाक्याच्या अहवालाबाबत

**(९) ८५१४१ (१२-०८-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगतीमार्ग तसेच मुंबईतील पाच एंट्री पॉईंट वरील टोलनाक्यांबाबत आनंद कुलकर्णी व सुमित मलिक यांच्या समितीने तीन महिन्यांऐवजी दहा महिन्यानंतर सादर केलेला अहवाल गत १२ ते १५ महिन्यांपासून शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समितीने दिलेल्या अहवालानुसार कंपनीने टोल वसुलीचे लक्ष्य माहे, नोव्हेंबर, २०१६ मध्येच पूर्ण केले असून एमएसआरडीसीने या प्रकरणी माहिती अधिकारात दिलेल्या माहितीनुसार कंपनीने ३५० कोटी रुपयांची जादा वसुली केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर टोलनाके अद्यापी बंद न करण्याची कारणे काय आहे,
(४) असल्यास, सदरचे टोलनाके बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०१८) :** (१) सदर समितीने दि. २७.०४.२०१६ रोजी मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गावरील टोलनाक्यांबाबत अहवाल महाराष्ट्र शासनास सादर केला आहे. या बाबतचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे.
(२) समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने, हे खरे नाही.
(३) समितीचा अहवाल शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(४) मुद्दा क्र. ३ प्रमाणे.
(५) मुद्दा क्र. ३ प्रमाणे.

---

### तिवसा (जि.अमरावती) येथील शासकीय मुलींच्या वसतीगृहाच्या भुखंडाचे दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) ९०५१६ (१२-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (जि.अमरावती) येथे मंजूर झालेल्या शासकीय मुलींच्या वसतीगृहाच्या नियोजीत भुखंडाचे दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपविभागीय अधिकारी तिवसा-भातकुली यांना दिनांक १२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दस्तऐवज लोकप्रतिनिधींना उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे दिनांक २५/०४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये तिवसा, जि.अमरावती येथे मंजूर झालेल्या शासकीय मुलीच्या वसतीगृहाच्या नियोजीत भुखंडाचे दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती. तथापि तहसिलदार, तिवसा यांनी गृहपाल, मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, तिवसा, ता. तिवसा यांना मौजा तिवसा, सुरवाडी खु. व सुरवाडी बु. या गावाला लागून मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह इमारत बांधकाम करण्याकरीता ई-वर्ग जमीन उपलब्ध नसल्याबाबत दि. ०८/०६/२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे.

---

## भातकुली (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील जागा जिल्हापरिषद अमरावतीकडे हस्तांतरित करण्याबाबत

**(११) ९४३२२ (१२-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील पंचायत समिती भातकुलीची इमारत तथा खुली जागा व तालुका भूमी अभिलेख, अमरावती यांची सिट नं. ३१ प्लॉट नं.१७ ही जागा जिल्हा परिषद अमरावती यांचे नावे हस्तांतरीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी यांना दिनांक १६ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१८) :** (१), (२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदरहू प्रकरणी दि. १६/०७/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिले होते. उक्त निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी सादर केलेला प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे कार्यालयामार्फत शासनास दि. २२/०५/२०१८ च्या पत्रान्वये प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

---

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील वाढत्या अपघातांबाबत

**(१२) ९५६०४ (२१-१२-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हनुमंत**

**डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर गत काही महिन्यांच्या कालावधीत अनेक वाहनांचे भीषण अपघात होऊन अनेक नागरिक मृत्युमुखी पडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावरील आडोशी बोगदा, भातान बोगदा, कामशेत बोगदा व लोणावळा बोगद्याजवळ लागोपाठ झालेल्या अपघातामध्ये अनेक नागरिक मृत्युमुखी पडल्याने मार्गावर वारंवार होणाऱ्या वाहतुक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालात समितीने केलेल्या शिफारशीनुसार शासनाने योग्य तो निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त अहवालात समितीने केलेल्या प्रमुख शिफारशी कोणत्या व त्यांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील अपघात टाळण्यासाठी व वाहतूक सुरळीत राहण्याच्या दृष्टीने इंटेलिजन्ट हायवे मॅनेजमेंट सिस्टम कार्यान्वीत करण्यासाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीकडून शिफारशी शासनास प्राप्त झाल्या आहेत. सदर शिफारशींवर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर समितीने महाराष्ट्र शासनास खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

i) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ किंवा परिवहन आयुक्त यांना प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नेमण्यात यावे.

ii) आर्थिक तरतूद उपलब्ध करावी.

iii) प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी MSRDC, Motor Vehicle Dept. ADGP, (Traffic) and DIT यांची प्रकल्प मॉनिटरींगसाठी समिती स्थापिती करावी.

iv) KPMG ही संस्था परिवहन आयुक्त आणि गृह खात्याच्या ई-चलन व सि.सि.टि.व्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून काम करत असल्याने या प्रकल्पासाठी सुध्दा KPMG यांची नेमणूक करणे योग्य होईल. या प्रकल्पासाठी परिवहन व गृह विभागाच्या सल्ल्याने, माहिती अदानप्रदान करुन, उत्कृष्ट सहकार्याने काम करणारी स्वतंत्र टिम LPMG यानी नेमावी.

v) प्रकल्प कार्यान्वयनासाठी योग्य तंत्रज्ञान मिळविण्यासाठी इक्सप्रेशन ऑफ इन्टरेस्ट मागवून त्यानंतर रिक्वेस्ट फॉर प्रपोजल मागवावे.

यासंदर्भात प्राप्त झालेल्या शिफारशींवर निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथील तहसील कार्यालयाची नविन इमारत बांधण्याबाबत**

**(१३) ९७०७१ (२१-१२-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथे तहसील कार्यालयाची नविन इमारत बांधकामास मान्यता देऊन निधीचा पुरवठा करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसुल मंत्री, यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केल्याचे दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने नांदगाव खंडेश्वर येथे तहसील कार्यालयाची नविन इमारत बांधकामाच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०५-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) नांदगांव खंडेश्वर येथे तहसिल कार्यालयाची नवीन इमारत बांधकामाच्या रु.७७१.५५ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.बीएलडी-२०१६/प्र.क्र.१९५/ई-८, दि.२२/०२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सन २०१८-१९ च्या नवीन कामांच्या यादीत या कामाचा समावेश करण्यात आला असून या इमारतीसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

---

**निघोज (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील तहसिल कार्यालयासमोर नागरिकांनी केलेले उपोषण**

**(१४) ९७२७३ (२२-१२-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निघोज (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील घरे पाडल्याच्या निषेधार्थ नागरिकांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास नेवासा तहसिल कार्यालयासमोर उपोषण केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी व शासकीय जागेवर राहत असलेल्या कुटुंबाना मालकी हक्काचे उतारे त्वरित मिळावेत असे मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या उपोषणकर्त्यांच्या मागण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०६-२०१८) :** (१) होय. मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.६६/२०१४ मधील आदेश दिनांक २९/७/२०१५ नुसार मौजे निघोज ता.पारनेर येथील शासकीय गायरान जमिनीवर झालेली रहिवास प्रयोजनाची अपात्र अतिक्रमणे तहसिलदार, पारनेर यांनी निष्कासित केल्याच्या निषेधार्थ नेवासा तालुक्यातील झोपडपटटी धारक नागरीक यांनी १४/९/२०१७ रोजी नेवासा तहसिल कार्यालयासमोर उपोषण केले आहे.

(२) जनहित याचिका क्रमांक ३९/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३/६/२०१५ रोजी आदेश पारित केलेले असुन त्यात प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी वा शासकीय जागेवर राहत असलेल्या कुटूंबाना मालकी हक्काचे उतारे त्वरीत मिळावेत याबाबत मा.उच्च न्यायालयामार्फत आदेशीत करण्यात आलेले नाही.

(३) व (४) शासकीय जमिनीवरील झोपडपटटीची झालेली अतिक्रमणे नियमानुकुल करणेबाबत शासन निर्णय दिनांक ४/४/२००२ नुसार संबंधित तहसिलदार यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणेबाबत निदेश देण्यात आलेले आहेत. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील पत्र दिनांक १३/८/२०१५ अन्वये अहमदनगर जिल्हयातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना जनहित याचिका क्र.३९/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या दिनांक २३/६/२०१५ रोजीच्या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तहसील कार्यालय अमरावती व पंचायत समिती अमरावती (जि.अमरावती) या कार्यालयांच्या नविन प्रशासकीय इमारतीबाबत

**(१५) ९९५१९ (२१-१२-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तहसील कार्यालय, अमरावती व पंचायत समिती, अमरावती (जि.अमरावती) या कार्यालयांच्या नविन प्रशासकीय इमारतीकरीता जागा व निधी उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल मंत्री यांना दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी निवेदन दिले असून त्यापुर्वी अनेकवेळा मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तहसील कार्यालय, अमरावती व पंचायत समिती, अमरावती या कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीकरीता जागा व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मा.मंत्री (महसूल) यांना दि.०५/१०/२०१७ रोजी निवेदन दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयाकडून विषयांकित प्रकरणाबाबतचा अहवाल/प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या कार्यालयामार्फत शासनास सादर करण्याबाबत दि.९/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदरहू अहवाल/प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील कोळंबिका देवी देवस्थानाला शासनाने इनाम दिलेल्या २०० एकर जमिनीबाबत**

**(१६) १००३८२ (२२-१२-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील कोळंबिका देवी देवस्थानाला शासनाने इनाम दिलेली २०० एकर पेक्षा जास्त जमीन बेकायदेशीरपणे कुळांच्या नावे करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या दिनांक ३० जुलै, २०१० रोजीच्या परिपत्रकानुसार देवस्थानांना इनाम म्हणून दिलेली जमीन हस्तांतरीत वा कुळाच्या नावे करता येत नसल्याने सदर इनाम जमीन कुळाच्या नावावर करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर जमीन कोळंबिका देवी देवस्थानाला इनाम म्हणून परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०६-२०१८) :** (१) व (२) होय. मौजे त्र्यंबकेश्वर येथील गट नं.३०१, ३२१, ३२७, ३२२/२, ३२३, ३२५, ३२८, ३२४, ३५८, ३०० व ३२६ या देवस्थान मिळकती कोळंबिका देवी व गंगाव्दार ट्रस्ट यांच्या नावे होत्या. सदर मिळकती ट्रस्ट कडुन सौ.संध्या दप्तरी व इतर यांनी सन २००७ मध्ये अकृषिक प्रयोजनार्थ शासन व धर्मादाय आयुक्त यांच्या परवानगीशिवाय नऊ वर्षाच्या भाडेपटटयाने वहितीस घेतल्या. तदनंतर श्री.सचिन दप्तरी व इतर यांनी तत्कालीन तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण, त्र्यंबकेश्वर यांचेकडे कुळ कायदा कलम ३२-ओ प्रमाणे सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन तहसिलदार, त्रंबकेश्वर यांनी सदर जमीनीची किंमत ठरवुन जमीन खरेदी करणेबाबतचे आदेश पारित करुन ३२ एम प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. सदर आदेशास अनुसरुन सदर देवस्थान जमीनीचे खरेदीचा व्यवहार नोंदणीकृत करण्यात आल्यानुसार सदर जमीनी सौ.संध्या सचिन दप्तरी व इतर यांना अदा केलेल्या आहेत.

(३) व (४) तत्कालिन तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांनी पारित केलेल्या कुळ कायदा आदेशांच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, त्र्यंबकेश्वर यांच्या स्तरावर स्वाधिकारे चौकशीची कार्यवाही चालु करण्यात आली आहे. तसेच देवस्थानाच्या जमीनी हस्तांतरणास वैधानिक प्रत्यवाय असतांना शासकीय दस्तावेज तयार करुन आणि पदाचा गैरवापर केल्याच्या अनुषंगाने नायब तहसिलदार (प्रशासन), त्र्यंबकेश्वर यांनी शासनाच्या वतीने तत्कालिन तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी व इतर यांच्याविरुध्द त्र्यंबकेश्वर पोलीस ठाणे येथे एफ.आय.आर.क्र.००२०/२०१८ दि. २५/२/२०१८ रोजी नोंदविण्यात आलेला आहे.

तत्कालिन राज्यमंत्री (महसुल) यांनी सदर मिळकतीच्या अनुषंगाने दिलेले अर्धन्यायिक आदेश दिनांक १३/५/२०१४ हे मा.मंत्री (महसुल) यांनी पुनरिक्षणात घेवुन दिनांक १४/३/२०१८ रोजीच्या आदेशानुसार मुळ आदेश रदद केलेले आहेत. मा.मंत्री (महसूल) यांचे सदर आदेश

मा.उच्च न्यायालयात रिट याचिका (स्टॅम्प) क्र.९१३६ /२०१८ अन्वये आव्हानित करण्यात आलेले असुन मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार Interim relief असे आदेश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गुहागर -चिपळूण- विजापूर या महामार्गासाठीच्या भूसंपादनाबाबत

**(१७) १०२०२८ (२१-१२-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुहागर-चिपळूण-विजापूर या रा.म.मार्गाच्या रुंदीकरण कामासाठीच्या भूसंपादनाबाबत चिपळूण तालुक्यातील स्थानिक जमीनदारांनी तक्रारी केल्या आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत संबधीत जमीनदार व महामार्ग अन्याय निवारण समितीच्या सदस्यांनी उपविभागीय अधिकारी, चिपळूण यांची भेट घेऊन आपल्या मागण्या सादर केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) गुहागर-विजापूर महामार्ग अन्याय निवारण समिती व इतर खातेदारांनी दि.२३.०८.२०१७ रोजी त्यांच्या विविध मागण्यासंदर्भात एकत्रीत निवेदन दिले आहे.
(३) खातेदारांनी निवेदनात नमूद केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने महामार्गासाठी थेट खरेदीने जमिनी संपादन करणार असल्याबाबतची कार्यवाही भूसंपादन संस्थेने प्रस्तावित केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रत्नागिरी-वारंगा फाटा राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ साठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(१८) १०२६९९ (२१-१२-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातून जाणाऱ्या रत्नागिरी ते नागपूर (राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१) (वारंगा फाटा) या महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यासाठी उपविभागीय अधिकारी, कार्यालयाकडून विलंब लावला जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भूसंपादनाच्या मोबदल्याची २०० कोटी रुपयांची रक्कम रस्ते प्राधिकरणाने उप विभागीय अधिकारी कार्यालयाला संबंधित शेतकऱ्यांना वाटपासाठी दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऐनवेळी राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालकांनी जमीनी संपादनावेळी नोंदणी मुद्रांक शुल्क विभाग यांचे कोष्टक १६(अ) नुसार ठरलेला मावेजाचा दर रद्द करुन दुय्यम मुद्रांक शुल्क कोष्टक २९ (ब) नुसार मावेजाची रक्कम वाटपासाठी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून मूळ मंजूर रकमेप्रमाणे मावेजाचे वाटप न करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच मूळ मंजूर रकमेप्रमाणे मावेजाचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

मुळ निवाड्यामध्ये मुद्रांक शुल्क विभागाचे शिघ्र सिध्दगणक २०१५ मधील कोष्टक १६ (अ) प्रमाणे मावेजाची परिगणना करण्यात आली होती. तथापी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. जा.क्र.१५/हायवे सन्मुख जमिनी/ मुल्यांकन/ परिपत्रक/३४८,दि.५.०४.२०१६ अन्वये जमिनीचे मुल्यांकन महाराष्ट्रासाठी लागु असलेल्या मार्गदर्शक सूचना क्र. २९ (ब) नुसार करण्यात यावे असे परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार हायवे सन्मुख जमिनीसाठी कोष्टक २९ (ब) वापरून परिगणना करून सुधारीत निवाडा घोषित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनमाड (ता.नांदगांव, जि.नाशिक) शहरासाठी तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयाची नविन इमारत बांधण्याबाबत**

**(१९) १०३२९९ (२१-१२-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (ता.नांदगांव, जि.नाशिक) शहराची लोकसंख्या एक लाखापेक्षा अधिक असून येथील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयाची इमारत जुनी झाल्यामुळे मोडकळीस आलेली असल्याने कामकाजास अपुरी पडून दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून मनमाड येथे तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयाची नविन इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१८)** : (१) सदर इमारत जुनी आहे हे खरे आहे. मात्र, मोडकळीस आलेली नाही.

(२) व (३) मनमाड येथे तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या कार्यालयाच्या नविन इमारतीचा प्रस्ताव तयार करण्याची तजवीज ठेवली आहे.

---

**मौजे खराबवाडी (ता.खेड,जि.पुणे) येथील अवैध उत्खननाबाबत**

**(२०) १०३३६९ (२१-१२-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खराबवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील गट क्र..३५७/१०१, ३५७/१०३, ३५७/१०४ मधून माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अवैध उत्खनन झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध उत्खननाचे पंचनामे करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचानाम्याच्या अनुषंगाने टेकडी फोडून अनधिकृतपणे गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१८) :** (१), (२) व (३) मौजे खराबवाडी, ता.खेड, जि.पुणे येथील जमीन गट नं.३५७/१०१, ३५७/१०३ व ३५७/१०४ मधून अनधिकृतपणे गौण खनिज उत्खनन केल्याचे आढळून आल्याने तहसीलदार, खेड यांनी दि.२१/३/२०१६ रोजी संबंधितांविरुध्द रुपये ९७,४१,०००/- इतक्या रक्कमेचे दंडात्मक आदेश पारित केले आहेत. त्यापैकी रु.४४,००,०००/- इतकी दंडात्मक रक्कम संबंधित व्यक्तीने शासनजमा केली आहे. अन्य संबंधित व्यक्तीने रु.५३,४१,०००/- इतकी रक्कम अद्याप शासनजमा केली नसल्याने त्याचे मालकीच्या जमिनीच्या गाव नमुना नं.७/१२ वर बोजा चढविण्यात आला असून सदर रक्कम वसूल करणेची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मांडवेदिगर, भिलमळी व मुशाळतांडा (ता.भुसावळ, जि.जळगाव) या गावांच्या ७/१२ वर गावातील रहिवाशांची नावे लावण्याबाबत**

**(२१) १०४७५२ (२७-०३-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडवेदिगर (ता.भुसावळ, जि.जळगाव) ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत मांडवेदिगर, भिलमळी व मुशाळतांडा या तिनही गावांच्या ७/१२ वर अन्नपूर्णा सरवनदास व सुशीला लखनदास यांची नावे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील ग्रामस्थांनी ७/१२ वरील उक्त दोन्ही नावे रद्द करून गावातील रहिवाशांची नावे लावण्याबाबत प्रांत अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर अपील जलदगतीने निकाली काढून सदर गावांच्या ७/१२ वर गावातील रहिवाशांची नावे लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मांडवे दिगर ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत मौजे मांडवेदिगर येथील गट नं.१ ते १०२ (नोंद क्र.८९२) व मौजे भिलमळी येथील गट नं.१ ते ६३ (नोंद नं.५२३) बाबत अन्नपुर्णा सनवरदास व सुशील लखनदास यांची नावे रदद करुन गावातील रहिवाशांची नावे लावण्याबाबत उपविभागीय अधिकारी, भुसावळ यांच्याकडे दिनांक ०१/०३/२०१६ रोजी अपील केस क्र. ३०/२०१६ दाखल करण्यात आली. सदर अपीलाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी भुसावळ यांच्यामार्फत पक्षकारांना दिनांक १४/०५/२०१६ रोजी सुनावणी देवून म्हणणे मांडण्याची पुरेपुर संधी देण्यात येवुन चौकशी करण्यात आलेली आहे.
(४) सदर अपीलाच्या वादी व प्रतिवादी यांचेशी उप विभागीय अधिकारी,भुसावळ यांनी चर्चा केली असता, मा.उच्च न्यायालयात सदर वाद मिळकती बाबत रिट पिटीशन क्र. ४६७७/२००३ दाखल असुन सदर रिट याचिकेमध्ये सिव्हील ॲप्लीकेशन क्र.७५६०/ २०१७ दाखल असल्याचे निदर्शनास आले. यास्तव उप विभागीय अधिकारी,भुसावळ यांनी दिनांक ३१/५/२०१७ रोजीच्या अर्धन्यायिक आदेशानुसार मा.उच्च न्यायालयाकडील निर्णयानंतर महसूल दप्तरी योग्य त्या नोंदी करण्यात येतील,या निष्कर्षासह न्यायालयीन कामकाज सुप्त अवस्थेत ठेवून अपील अर्ज निकाली ठेवला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कोरेगाव (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(२२) १०७०२२ (२७-०३-२०१८). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोरेगाव (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम मंदगतीने चालू असून त्यामुळे बांधकाम खर्च वाढत असल्याने बांधकामासाठी निधी मिळण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे व त्यावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार सदर इमारतीच्या बांधकामासाठी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१८) :** (१) होय.
(२) इमारतीचे बांधकाम अदयाप सुरु झालेले नाही. अस्तित्वातील तहसील कार्यालयाची इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधण्याचे नियोजीत होते. तथापी अस्तित्वातील तहसील कार्यालयाची इमारत इतिहासकालीन असल्याने प्रस्तुत मध्यवर्ती प्रशासकीय इमारत अन्य ठिकाणी बांधण्याचे नियोजन केले असून त्यानुसार कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) सन २०१८-१९ मध्ये सदर कामासाठी रु.१५० लक्षची तरतूद करण्यांत आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील प्रमुख जिल्हामार्ग व ग्रामीणमार्गांची झालेली दुरवस्था**

**(२३) १०७३६४ (२८-०३-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील प्रमुख जिल्हामार्ग व ग्रामीणमार्गावर पडलेले खड्डे बुजविण्याचे काम जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून मागणी करुनही केले जात नाहीत अश्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी जिल्हापरिषदेच्या बांधकाम विभागाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) करमाळा तालुकयामधील सा.बां. विभागाच्या अखत्यारितील प्रजिमार्गाची एकूण लांबी ४२७ कि.मी. आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील पडलेले खड्डे भरण्यात आले आहेत. सदयस्थितीत रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील येणा-या रस्त्यांची लांबी ९७० कि.मी. असून रस्ता दुरुस्तीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार सर्व रस्त्यांची पाहणी करण्यात आली आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदपूर ते पामगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(२४) १०७७०० (२७-०३-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर ते पामगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) या रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून रस्ता वाहतूक योग्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्त्याचे काम पूर्ण झाले असून वाहतूक सुरळीत चालू आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दुय्यम निबंधकाची नेमणूक करण्याबाबत**

**(२५) १०९४३१ (२७-०३-२०१८). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील दुय्यम निबंधकाचे पद रिक्त असून उक्त पदावर तातडीने दुय्यम निबंधकाची नेमणूक करण्याबाबत अंबरनाथ येथील लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व किती कालावधीत उक्त कार्यालयात दुय्यम निबंधकाची नियुक्ती करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंबरनाथ तालुक्यातील सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर क्र.३ या कार्यालयाचे सह दुय्यम निबंधक उल्हासनगर-२ या कार्यालयाचे कार्यक्षेत्राशी सामाईक (Concurrent) कार्यक्षेत्र घोषित करण्यासाठी नोंदणी महानिरीक्षक यांच्याकडून प्रस्ताव दि.१८.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**न्हावेली-आरोंदा (ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग) रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(२६) १०९४४१ (२८-०३-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) न्हावेली-आरोंदा (ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग) मार्गावर जागोजागी खड्डे पडून रस्ता वाहतूकीस धोकादायक झाला असल्याने त्याची दुरुस्ती व डांबरीकरण करावे अशी मागणी ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी जिल्हापरिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्ती व डांबरीकरणाच्या कामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रश्नांकित न्हावेली-आरोंदा रस्ता राज्य मार्ग क्र. १६५ चा भाग आहे. सदर रस्त्याच्या ०/० ते १५/४०० या खराब लांबीतील डांबरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. रस्त्यावरील खड्डे भरण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागणी-निजामाबाद (जि.नांदेड) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२७) ११०१७३ (२७-०३-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील कुंडलवाडी येथून ६ कि.मी अंतरावर असलेला नागणी-निजामाबाद हा ७ कि.मी चा मार्ग नादुरुस्त झाला असल्याने वाहतूकीस बंद केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला शहरातील शासकीय भूखंडाचा बनावट आदेश तयार केल्याबाबत**

**(२८) ११०३०८ (०४-०४-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरातील शासन मालकीच्या ५९४९ चौरस फुट क्षेत्रफळ असलेल्या भूखंडाबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने बनावट आदेश तयार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी अकोला शहर नझुल शीट क्र.२७ प्लॉट क्र.७११९ क्षेत्र ५९४९ चौ.फुट जागेचा तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्या बनावट आदेशाची १० नोव्हेंबर, २०१७ रोजी निवासी जिल्हाधिकारी अकोला यांनी पडताळणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पडताळणी अंती सदर प्रकरणाचा आदेश बनावट असल्याचे निदर्शनास आल्यामुळे नायब तहसीलदार अकोला यांनी अज्ञात आरोपी विरुद्ध शहर कोतवाली अकोला येथे फिर्याद दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणातील दोषी अधिकारी व इतर संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) निवासी जिल्हाधिकारी, अकोला यांनी दि. १०/११/२०१७ रोजी बनावट आदेशाची पडताळणी केली असता तत्कालीन नझुल अधिकारी व तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्या अद्याक्ष-या व स्वाक्ष-या बनावट असल्याचे आढळून आले. त्यास अनुसरून या प्रकरणी शहर कोतवाली, अकोला येथे अज्ञात व्यक्तीविरुध्द दि. १२/०१/२०१८ रोजी प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरु आहे.

---

**सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार (जि.पालघर) अंतर्गत करण्यात आलेल्या कामांबाबत**

**(२९) ११०७०५ (२७-०३-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार (जि.पालघर) अंतर्गत आदिवासी तालुके व बिगर आदिवासी तालुक्यांसाठी सन २०१५-१६ व २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात शासनाने कोट्यवधी रुपये मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने उक्त तालुक्यात या दोन वर्षात किती कामांच्या ई निविदा प्रक्रिया पूर्ण केल्या तसेच किती कामांना सुरुवात केली आहे,

(३) तसेच अद्यापपर्यंत या तालुक्यातील कामांच्या ई-निविदा प्रक्रिया झाल्या नसल्यास विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०१५-१६ या वर्षात रू.५०८७.३७ लक्ष मंजूर केले होते. तसेच सन २०१६-१७ या वर्षात रु. ४९६८.७७ लक्ष मंजूर केले होते.

(२) सन २०१५-१६ या वर्षात सर्व मंजूर ३९० कामांच्या व सन २०१६-१७ या वर्षात एकूण मंजूर ३२४ पैकी २८९ अशा एकूण ६७९ कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण केल्या असून सर्व कामांना सुरवात केली आहे.

(३) व (४) सन २०१६-१७ च्या उर्वरित मंजूर ३५ कामांपैकी २४ कामे मोठया पूलांची असून त्यांचे सर्वेक्षणाचे काम प्रगतीत आहे. तसेच ११ कामांची एकच निविदा काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) या तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३०) ११०९५६ (२७-०३-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) या तालुक्यातील नादुरुस्त रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाने रू.७.६० कोटीचा निधी माहे डिसेंबर, २०१७ च्या पुरवणी अर्थसंकल्पामध्ये मंजूर केला असून रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यताही मिळाल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकीय मान्यता मिळून व निधी प्राप्त होऊन सुद्धा उपरोक्त दोन्ही तालुक्यातील रस्त्यांच्या दुरूस्तीची कामे अद्यापी सुरू केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, या तालुक्यातील रस्ते दुरुस्तीच्या कामांना तातडीने सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्नांकित रस्त्याच्या दुरुस्तीसाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात रु.७.६० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. या कामाची निविदा प्रक्रिया प्रगती पथावर असून निधी निकष प्राधान्य क्रमानुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत दोन्ही तालुक्यातील रस्ते सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील वनविभागास हस्तांतर झालेल्या गायरान जमिनीची मोजणी करून ताबा देण्याबाबत**

**(३१) १११९७ (२७-०३-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील अनेक गावातील गायरान जमिनी जिल्हाधिकारी, लातूर यांनी वनविभागास हस्तांतरित केल्या असून सदर जमिनीची मोजणी प्रक्रिया व ताबा प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील वनविभागास हस्तांतरित केलेल्या किती गावातील जमिनीची मोजणी व ताबा देण्याची कार्यवाही प्रलंबित आहे,
(३) असल्यास, सदरची कार्यवाही प्रलंबित असण्याची कारणे काय तसेच सदर जमिनीवर वनीकरण करण्यासाठी जमिनींची मोजणी करून वनविभागास ताबा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०५-२०१८) :** (१) व (२) होय, रेणापूर तालुक्यातील हस्तांतरित केलेल्या ७ गावातील जमिनीचा ताबा वनविभागास देण्यात आलेला आहे, तथापि, सदर गावातील जमिनीची मोजणी प्रलंबित आहे.
(३) नोव्हेंबर २०१७, नंतर जिल्हाधिकारी, लातूर यांच्या कार्यालयाकडून उपअधीक्षक, भूमि अभिलेख, रेणापूर यांच्या कार्यालयाकडे ७ गावांतील गायरान जमीन मोजणी प्रस्ताव पाठविण्यात आले. उपरोक्त प्रस्तावानुषंगाने सदर कार्यालयाकडून तहसिल कार्यालयाकडील काही कागदपत्रांची पूर्तता करुन घेण्यात आली असून मे, २०१८ मध्ये मोजणी करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या सन २०१३ च्या भूसंपादन कायद्याबाबत**

**(३२) १११५७२ (२७-०३-२०१८). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय योजनांसाठी भूसंपादन करताना बाजारभावाच्या चारपट मोबदला जमीन मालकांना देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून सदर मोबदला देण्यासाठी केंद्र शासनाच्या सन २०१३ च्या भूसंपादन कायद्यात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या निर्णयामुळे प्रकल्प खर्चात वाढ होऊन याचा भार सर्वसामान्यांवर पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कायद्यात बदल करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०६-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने “The Right to fair compensation and Transparency in land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, २०१३” हा नवीन भूसंपादन कायदा तयार केलेला असून सदर कायदा दिनांक १.१.२०१४ पासून अंमलात आला आहे.

सदर कायद्यातील कलम २६ ते ३० च्या तरतूदीमध्ये जमिनीचा मोबदला ठरविण्याची कार्यपद्धती नमूद करण्यात आली आहे.त्यामधील कलम २६ (२) आणि पहिले परिशिष्ट मधील तरतूदीनुसार राज्य शासनाने निश्चित केलेल्या गुणांक (Multiplier Factor) नुसार संबंधितांना संपादक संस्थेमार्फत मोबदला अदा करण्यात येतो.

सद्यस्थितीत, केंद्र शासनाच्या ‘RFCTLARR Act, २०१३’ मधील संबंधित कलमांमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने “RFCTLARR (Maharashtra Amendment) Bill, २०१८ (विधानसभा विधेयक क्रमांक ७) मार्च-२०१८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मा.विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांकडून मंजूर झालेले आहे. मंजूर केलेल्या विधेयकास मा.राष्ट्रपती महोदयांची मान्यता प्राप्त झालेली असून अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.२६.०४.२०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

(२) उक्त दि.२६.०४.२०१८ रोजीच्या सुधारणांमुळे मूल्यांकनामध्ये बदल नसल्यामुळे आर्थिक भार पडण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) उक्त दि.२६.०४.२०१८ रोजीच्या सुधारणांमुळे सार्वजनिक प्रयोजनासाठी लागणाऱ्या खाजगी जमिनी संपादित करण्याच्या कामकाजास वेग येऊन संपादनाची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण होऊन संबंधित प्रकल्प विहित वेळेत मार्गी लावता येईल व भूसंपादनाची कार्यवाही जलद गतीने होऊ शकते.

---

**महाड (जि.रायगड) तालुक्यातील तलाठ्यांची पदे भरून तलाठी सज्जांची संख्या वाढविण्याबाबत**

**(३३) ११२०१३ (२७-०३-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील १८४ गावांसाठी केवळ ३६ तलाठी सज्जा असल्याने सर्व गावांना योग्यवेळी योग्य सुविधा पुरविता येत नसल्याचे तसेच तलाठ्यावर शासकीय व इतर कामांचा ताण पडत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीमध्ये वडवली, महाड, कोंझर, खरवली, मांघरुन, शेलटोली, वरंध, बिरवाडी या आठ गावांतील तलाठ्यांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यात तलाठयांची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून महाड तालुक्यातील तलाठ्यांची पदे भरण्याबाबत व तलाठी सज्जांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०६-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) महाड तालुक्यात एकूण ३७ तलाठी पदे मंजूर आहेत. त्यापैकी २९ भरलेली असून ८ रिक्त आहेत. सदर रिक्त पदांपैकी ५ पदे पदोन्नती / बदलीने व ३ पदे निलंबनाने रिक्त झालेली आहेत. महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २५ मे, २०१७ नुसार राज्यातील वाढती लोकसंख्या व वाढते नागरीकरण याअनुषंगाने क्षेत्रिय महसूल यंत्रणेच्या कामात झालेली वाढ विचारात घेता, राज्यात नविन ३१६५ तलाठी साझा व ५२८ नविन मंडळे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार कोकण महसूल विभागात एकूण ७४४ नविन साझांची व १२४ मंडळांची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २५.०५.२०१७ नुसार विभागाने सुधारित आकृतिबंध मंजूर केल्या खेरिज पद भरतीस बंदी आहे. तथापि, याबाबत वित्त विभागाशी विचारविनिमय करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**भोकरदन-सिल्लोड रस्त्यावरील दुभाजकावर रेडियम फलक लावण्याबाबत**

**(३४) ११२२३६ (२७-०३-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) - सिल्लोड (जि.औरंगाबाद) या रस्त्यावरील एका हॉटेलसमोरील दुभाजकावर कार धडकल्यामुळे पाच जण जखमी झाल्याचे तसेच त्यातील तिघांची प्रकृती चिंताजनक असून या दुभाजकावर अद्यापपर्यंत पाच ते सहा वाहने धडकुन अपघात झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुभाजकावर रेडियम फलक लावण्याची मागणी करुन सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे वाहनधारकांकडून संताप व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीनुसार या मार्गावर रेडियम फलक लावण्याबाबत तसेच त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे. दि.२२/०१/२०१८ रोजी प्रश्नाधीन दुभाजकावर वाहन धडकून अपघात झाल्याची नोंद पोलीस अहवालात आढळून येते.
(२) हे खरे नाही.
सदर रस्ता दुभाजकावर रेडियम फलक दि.११/०२/२०१८ रोजी उभारण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोसेखुर्द प्रकल्पाच्या (जि.चंद्रपूर) उजव्या कालव्याअंतर्गत येणाऱ्या असोलामेंढा तलावामुळे आठ गावांचे शेतकरी बाधित होत असल्याबाबत**

**(३५) ११३०२५ (०१-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोसेखुर्द प्रकल्पाच्या (जि.चंद्रपूर) उजव्या कालव्याअंतर्गत येणा-या असोलामेंढा तलावामुळे आठ गावांचे शेतकरी बाधित होत असून त्यांच्या मागण्यांसदर्भात प्रकल्पबाधित शेतक-यांची आढावा बैठक माहे जोनवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान गुंजेवाही येथे घेण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बैठकीत कोणकोणत्या मागण्या मांडण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, या मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०६-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) या बैठकीत सरळ खरेदीने घेण्यात येणाऱ्या जमीनीचे प्रती हेक्टरी मोबदल्याबाबत चर्चा करण्यात आली. सरळ खरेदीने घेण्यात येणाऱ्या जमीनीचा मोबदला शासन निर्णय, दिनांक १२ मे,२०१५ व दि. ३० सप्टेंबर २०१५ तसेच शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी, २०१७ अन्वये निर्धारीत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाचोरा व भडगांव (जि.जळगांव) तालुक्यातील पूलांच्या बांधकामासाठी मंजूरी मिळणेबाबत**

**(३६) ११३०६६ (२७-०३-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा व भडगांव (जि.जळगांव) तालुक्यातील पूलांच्या बांधकामासाठी विशेष बाब म्हणून मंजूरी व निधी मिळणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार व लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार पाचोरा व भडगांव तालुक्यातील पूलांना विशेष बाब म्हणून मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित पुलांबाबत निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तामलवाडी ते येडशी राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ च्या भूसंपादनाचा मोबदला देण्यात झालेला भेदभाव**

**(३७) ११३१६४ (२७-०३-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तामलवाडी ते येडशी राष्ट्रीय म.मा.क्र. ५२ या रस्त्याचे उस्मानाबाद जिल्हयातील चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर असून या रस्त्याच्या चौपदरीकरणामध्ये तामलवाडी (ता.तुळजापूर,जि उस्मानाबाद) येथील नागरिकांना व शेतकऱ्यांना (घरे व शेती) मावेजा देताना भेदभाव करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील जमिनी एजंटमार्फत संपादित करण्यात आल्या असून केवळ २४ तासाची आगाऊ नोटीस देऊन घरे व जागा ताब्यात घेण्यात आल्या आहे तसेच यासाठी पोलीस बळाचा वापर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

प्रकरणात राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ चे तरतुदीस अनुसरून नियमानुसार मोबदला निश्चित करण्यात आला आहे. तसेच, नियमानुसार कार्यवाही अनुसरण्यात आली असल्यामुळे मावेजा देतांना भेदभाव करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सह दुय्यम निबंधकाच्या कार्यालातील डेटा ऑपरेटरची नेमणूक सेतू संस्थेमार्फत करण्याबाबत**

**(३८) ११३१९६ (२७-०३-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सह दुय्यम निबंधक कार्यालयातील डेटा ऑपरेटरची नेमणूक सेतू संस्थे मार्फत करावी असे आदेश होऊन २ वर्षाचा कालावधी झाला असला तरीही बहूसंख्य सह दुय्यम निबंधक कार्यालयातील संगणकाचे काम अनधिकृत व्यक्तीच करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील २८ सह दुय्यम निबंधक कार्यालयातील डेटा एन्ट्रीचे काम तेथील अधिकाऱ्यांच्या मर्जीतील व्यक्तीकडून केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सह दुय्यम निबंधक कार्यालयातील डेटा ऑपरेटर ची नेमणूक सेतू संस्थेमार्फत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०६-२०१८) :** (१) व (२) असे निदर्शनास आले नाही.

(३) नोंदणी व मुद्रांक विभागाचे अधिनस्त दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये सेतू संस्थेमार्फत तसेच "देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. सटाणा, जि.नाशिक" या तत्सम संस्थेमार्फत ६६० डेटा एंट्री ऑपरेटरची नेमणूक करण्यास परवानगी मिळण्याबाबतचा नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचा प्रस्ताव शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण व संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तलाठ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३९) ११३३७२ (२७-०३-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण व संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तलाठ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे कार्यरत असणाऱ्या तलाठ्यांवर अतिरिक्त कार्यभार पडत असल्यामुळे अनेक कामे प्रलंबित झाली असून त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून चिपळूण व संगमेश्वर तालुक्यातील तलाठ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०६-२०१८) :** (१) व (२) चिपळूण तालुक्यातील तलाठ्यांची ५४ पदे मंजूर असून ४८ भरलेली आहेत व ६ रिक्त आहेत. संगमेश्वर तालुक्यात ६९ पदे मंजूर असून ५२ भरलेली आहेत व १७ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार कार्यरत इतर तलाठ्यांकडे सोपविण्यात आला आहे. रिक्त पदांमुळे जनतेच्या कामाचा खोळंबा होऊ नये याची दक्षता तहसिल स्तरावर संबंधीत तलाठी यांचेकडून घेण्यात येत आहे.
(३) वित्त विभाग शासन निर्णय दि.२५ मे, २०१७ नुसार विभागाने आकृतिबंध नव्याने मंजूर करुन घेतल्याखेरीज पदभरतीस बंदी आहे.

तथापि, याबाबत वित्त विभागाशी विचारविनिमय करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विशाळगड (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) घाटात अपघातांचे वाढलेले प्रमाण

**(४०) ११३५०० (०४-०४-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विशाळगड (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथे लाखो पर्यटक पर्यटकासाठी येत असून सदर गडावर जाण्यासाठी घाटातून जावे लागते, घाटाच्या दुतर्फा घनदाट झाडी, अनेक वेडीवाकडे वळणे आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घाटात दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण वाढत असून अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार विशाळगडाकडे जाताना घाटात होणाऱ्या अपघातांचे प्रमाण टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.

शाहुवाडी पोलीस ठाणे यांच्या दप्तर नोंदीनुसार सन २०१८ मध्ये दोन अपघातांची नोंद झाली आहे. तथापी सदर दोन्ही अपघात हे वाहन चालकांच्या चुकीमुळे झाल्याचे नमूद आहे
(३) प्रश्नांकीत रस्ता हा प्रजिमा ७ असा असून सदर रस्त्याची एकुण लांबी २० कि. मी. इतकी आहे. यापैकी ५.८ कि.मी. घाट रस्ता असून वन विभागाच्या हद्दीतून जातो. हा घनदाट जंगलाचा प्रदेश आहे.

सद्य:स्थितीत घाट रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली झुडपे व गवत साफ करण्यात आले असून वळण रस्त्यावर माहिती व सुचना फलक बसवण्यात आले आहेत. तसेच सदर घाट रस्त्यांच्या काही लांबीत संरक्षण भींती बांधण्याचे तर काही लांबीत रुंदीकरणाचे काम पुर्ण झाले आहे. सद्य:स्थितीत घाट रस्ता सुस्थितीत असून रस्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील तलाठयांच्या लेखणी बंद आंदोलनांबाबत

**(४१) ११३७११ (२७-०३-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तलाठयांनी दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजीपासून लेखणी बंद आंदोलन सुरु केले असून जळगांव जिल्हयातील ४३२ तलाठी, ७३ मंडळ अधिकारी व अव्वल कारकुनांनी काळयाफिती लावून आंदोलनात भाग घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तलाठयांच्या व संबंधित कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१८) :** (१), (२) व (३) अमळनेर तहसिल हद्दीतील अवैध गौण खनिजांच्या वाहतूकीला आळा घालण्यासाठी गेलेल्या पिंपळवाडे या साझाच्या तलाठी कर्मचाऱ्यास संबंधित अवैध वाहतूक करणाऱ्यांकडून झालेल्या शिविगाळ व मारहाण प्रकरणी जळगांव जिल्हा तलाठी संघ व महाराष्ट्र राज्य तलाठी संघ यांनी प्रश्नाधिन नमूद आंदोलनात भाग घेतला असून सर्व आरोपींना अटक होईपर्यंत सदर आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला होता.

सदर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधिक्षक यांनी पाच आरोपींना अटक केली असून त्यांचेमार्फत अन्य आरोपींना अटक करणेसाठीचे प्रयत्न सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खरडी (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायतीच्या हद्दीमधील गृह आणि अन्य वाणिज्य उपयोजनाच्या प्रकल्पाबाबत

**(४२) ११४२५२ (२७-०३-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरडी (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये गृह आणि अन्य वाणिज्य उपयोजनाचा प्रकल्प सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे विकासकाकडून जमिनीचे सपाटीकरण करण्याचे काम सुरु असून मोठया प्रमाणात गौण खनिजाचे उत्खनन केले जात असल्याचे व त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार जमिनीचे सपाटीकरण करून गौण खनिजाचे अवैध उत्खनन करणाऱ्या विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१८) :** (१), (२) व (३) खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील स.नं.२२/२ व २२/६ या जमीनीचे सपाटीकरण करुन गृहनिर्माण आणि वाणिज्य प्रकल्प सुरु असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आली आहे.
(४) सदर जागेवर अनधिकृतपणे गौण खनिजाचे उत्खनन करुन सपाटीकरण केल्याबाबत संबंधित विकासकास कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविला होता. सदर विकासकाचा खुलासा प्राप्त न झाल्याने तहसीलदार, शहापूर यांनी दि.२ जानेवारी, २०१८ रोजी रुपये १३,२२,८८०/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश पारीत केले असून सक्तीच्या उपायाने सदर दंडात्मक रक्कमेची वसूलीची कार्यवाही तहसीलदार, शहापूर यांचेमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कशेळी (ता.भिवंडी,जि.ठाणे) ग्रामपंचायत परिसरात बेकायदा बांधलेल्या गोदामाबाबत**

**(४३) ११४६८३ (२७-०३-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कशेळी (ता.भिवंडी, जि.ठाणे) ग्रामपंचायत परिसरातील खाडी किना-याजवळील कांदळवन जमिनीवर राजरोसपणे भराव टाकून उभारण्यात आलेली २२ बेकायदा गोदामे महसूल विभागाने तोडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बेकायदा बांधकाम करणा-या गोदाम मालकांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच या गोदाम मालकांविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०६-२०१८) :** (१) मौजे कशेळी, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. १९३ या जमिनीवरील १७ बांधकामे अंशत: व ११ बांधकामे पूर्णत: दिनांक १९/०२/२०१८ रोजी निष्कासित करण्यात आली आहेत.

(२) व (३) मौजे कशेळी, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. १९३ या जमिनीवर डेब्रीजचा भराव करताना तिवरांचा ऱ्हास होत असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांविरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियमांतर्गत वेळोवेळी गुन्हे दाखल केले आहेत.

---

**गंधारपाले (ता.महाड,जि.रायगड) येथील बौद्धकालीन लेण्याच्या परिसरांत मातीचे उत्खनन करण्यात येत असल्याबाबत**

**(४४) ११५१२९ (२७-०३-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंधारपाले येथील बौद्धकाली लेणी राष्ट्रीय स्मारक असून पुरातत्व विभागाच्या अखत्यारित आहेत व या परिसरांमध्ये बांधकाम अथवा उत्खनन करण्यास मनाई असताना मुंबई-गोवा महामार्गाच्या कामासाठी एल अॅण्ड टी कंपनी या बौद्ध लेण्याच्या परिसरांतील मातीचे उत्खनन करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उत्खननावर कोणतीच कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू उत्खनन तातडीने थांबवून उक्त कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) महाड (जि.रायगड) तालुक्यामध्ये मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम एल अॅन्ड टी कंपनीमार्फत सुरु आहे. राष्ट्रीय महामार्गाचे भरावासाठी मौजे गांधारपाले, ता.महाड, जि.रायगड येथील स.नं.५/१, क्षेत्र ३९७.३० चौ.मी. या खाजगी जमिनीमधून शासनाची परवानगी न घेता सदर कंपनीने १२५२ ब्रास मातीचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्याने जमीन मालक आणि सदर कंपनीस तहसीलदार, महाड यांनी दि.२३/२/२०१८ रोजी रु.३६,१८,७८१/- इतक्या दंडात्मक रक्कमेची नोटीस बजावली आहे. तसेच सदरचे उत्खनन तात्काळ थांबविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील वाळू घाटांचे लिलाव करण्याबाबत**

**(४५) ११५१५२ (२७-०३-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात ६२ वाळू घाटांपैकी केवळ सहा घाटांचे लिलावच माहे जानेवारी, २०१८ च्या अखेर झाले असून पहिल्या २४ वाळू घाट लिलावांची रक्कम कमी झाल्यानंतर हे सहा लिलाव झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील सर्व वाळू घाटांचे लिलाव झाले नसल्याने बांधकाम व्यवसाय अडचणीत आला असून व्यवसायिकांचा व्यवहार ठप्प झाल्याने या क्षेत्रातील २० ते २५ टक्के रोजगारही कमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून नाशिक जिल्ह्यातील सर्व वाळू घाटांचे लिलाव तातडीने करुन वाळूची टंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०६-२०१८) :** (१), (२) व (३) नाशिक जिल्ह्यात सन २०१७-१८ करीता एकूण ६२ वाळुस्थळाकरीता लिलाव प्रक्रिया राबविण्याचे निश्चित केले होते. प्रथम टप्प्यात दि.१८/११/२०१७ ते ६/१२/२०१७ या कालावधीत २४ वाळुस्थळाकरीता लिलाव प्रक्रिया राबविण्यात आली. त्यापैकी ६ वाळुस्थळांकरीता बोली प्राप्त झाली. उर्वरित १८ वाळूस्थळांकरिता दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात बोली प्राप्त न झाल्याने हातची किंमत २५% कमी करण्यात आली. दरम्यान मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिका क्र.८१५१/२०१७, ८१४१/२०१७ व ८१३९/२०१७ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.२१/१२/२०१७ रोजी दिलेल्या आदेशामध्ये पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA) व पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) याशिवाय वाळु लिलावाची सुरु असलेली प्रकिया राबविण्यास स्थगिती दिली होती.

नाशिक जिल्ह्यात बांधकामांकरीता नाशिक जिल्ह्याशेजारील इतर जिल्ह्यातून वाळू उपलब्ध होत असून जिल्ह्यात क्रश्डसँन्ड सुध्दा उपलब्ध आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिका क्र.८१५१/२०१७, ८१४१/२०१७ व ८१३९/२०१७ ह्या मा.उच्च न्यायालयाने दि.२१/२/२०१८ रोजी निकाली काढल्या असल्याने शासनाच्या दि.३/१/२०१८ रोजीच्या वाळू/रेती निर्गती सुधारित धोरणानुसार वाळू लिलावाची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जावरा फत्तेपुर (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील रेती घाटाच्या लिलावाच्या रक्कमेतून परिसरातील नादुरुस्त रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४६) ११५७३१ (२८-०३-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जावरा फत्तेपुर (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील रेती घाटाच्या लिलावाच्या रक्कमेतून जावरा, ममदापुर, इसापुर, काटसूर, नमस्कारी, वणी व सुलतानपूर येथील नादुरुस्त रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनानक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेती घाटाच्या लिलावाच्या रक्कमेतून रेतीघाटाच्या परिसरातील गावात रस्ते दुरुस्ती करण्याबाबतचा शासन निर्णय सुध्दा पारित झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार जावरा फत्तेपुर येथील रेती घाटाच्या लिलावाच्या रक्कमेतून उक्त गावातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) वाळू/रेती निर्गती सुधारीत धोरण दि.३/१/२०१८ मधील अ.क्र.३ (४) मध्ये संबंधीत गावाच्या ग्रामसभेने वाळू/रेती गटाच्या लिलावास सहमती दर्शविल्यास, त्या गावाच्या वाळूगटाच्या सर्वोच्च बोलीच्या रक्कमेमधून वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम वजा करुन, उर्वरित रक्कमेपैकी खालीलप्रमाणे रक्कम ग्रामपंचायतीस देण्यात येईल, अशी तरतूद आहे :-

| लिलावाची रक्कम | रक्कम परतावा | किमान रक्कम |
|---|---|---|
| रु.१,००,००,०००/- पर्यंत | २५% | -- |
| रु.१,००,००,००१/- ते रु.२,००,००,०००/- पर्यंत | २०% | रु.२५,००,०००/- |
| रु.२,००,००,००१/- ते रु.५,००,००,०००/- पर्यंत | १५% | रु.४०,००,०००/- |
| रु.५,००,००,००१/- च्या वरील | १०% | रु.६०,००,०००/- |

तसेच शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दि.१/९/२०१६ अन्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करुन सर्व प्रकारच्या गौण खनिज खाणपट्टाधारक, परवानाधारक व वाळू लिलावधारकाकडून शासनास जमा करण्यात येणाऱ्या स्वामित्धनाच्या व लिलावाच्या रक्कमेच्या १० टक्के रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठानसाठी अंशदान म्हणून घेण्याचा निर्णय घेतला आहे. सदर निधीमधून ग्रामपंचायती क्षेत्रातील रस्ते, आरोग्य, इ. साठी निधी देय आहे.
(३) व (४) वाळू वाहतूकीमुळे ममदापूर, ईसापूर, काटसूर, नमस्करी या गावाचे रस्ते नादुरुस्त असल्याने सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत सरपंच, ग्रामपंचायत वणी यांचे दि.५/१/२०१८ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने उक्त गावांच्या रस्त्यांचा आराखडा व अंदाजपत्रके तयार करुन घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, अमरावती यांचेमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील तलाठ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४७) ११५८०७ (२७-०३-२०१८). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील १४ सज्जांमध्ये औंदे, मलवाडा, वसुरी, सारशी आणि वेहेलपाडा या नविन पाच सज्जांची भर पडली असून या १४ सज्जांमधील तलाठयांची चार पदे आणि कोतवालांची सात पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रिक्त पदांमुळे तसेच नवीन सज्जांच्या निर्मितीमुळे तलाठ्यांवर कामकाजाचा अतिरिक्त भार पडणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०६-२०१८) :** (१), (२), (३) (४) व (५) पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यात एकूण १४ तलाठी सजा असून त्या ठिकाणी १० तलाठी व ७ कोतवालांची पदे भरलेली असून ४ तलाठी व ६ कोतवालांची पदे रिक्त आहेत.

तलाठी संवर्गातील ४ पदे रिक्त असल्यामुळे प्रशासकीय सोयीचे दृष्टीने तसेच नागरिकांचे, शालेय विद्यार्थ्यांचे व शेतकऱ्यांचे तलाठी कार्यालयाशी संबंधीत असलेले काम वेळेत पूर्ण होण्यासाठी कार्यरत तलाठी यांना अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. विक्रमगड तालुक्यात कोतवालांच्या रिक्त पदांची भरती प्रक्रीयेची कार्यवाही सुरु असून पात्र व अपात्र उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २५ मे २०१७ नुसार विभागाचा सुधारित आकृतिबंध निश्चित केल्याखेरीज पदभरतीस बंदी आहे. तथापि याबाबत वित्त विभागाशी विचारविनिमय करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## मनवेलपाडा (जि.पालघर) येथे रेतीची चोरटी वाहतूक करताना पकडलेल्या तीन ट्रकांवर कारवाई न केल्याबाबत

**(४८) ११६०६४ (२८-०३-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनवेलपाडा (जि.पालघर) पोलिस ठाण्यात दिनांक ४ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या रात्री रेतीची चोरटी वाहतूक करणारे तीन ट्रक नेण्यात आल्यानंतर संबंधितांवर दोन दिवसात कोणताही गुन्हा दाखल न करता तथा फौजदारी कारवाई न करता केवळ दंडात्मक रक्कम वसूल करुन नायब तहसीलदार, विरार यांनी सदर ट्रक सोडून दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ट्रकवर कोणताही गुन्हा तसेच फौजदारी कारवाई न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर ट्रकवर तसेच कोणतीही कारवाई न करता ट्रक सोडणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१८) :** (१) दि.४/२/२०१८ रोजी विरार येथे वाळूची अवैधरित्या वाहतूक करणारे तीन वाहने (ट्रक) आढळून आल्याने नायब तहसीलदार, वसई यांनी तीन वाहनधारकांस प्रत्येकी रुपये ९९,८००/- याप्रमाणे एकूण रुपये २,९९,४००/- इतका दंड आकारुन, दंडनीय कार्यवाही होईपर्यंत तीन वाहने विरार पोलीस ठाणे (मनवेलपाडा) यांच्या ताब्यात दिले होते. दि.७/२/२०१८ रोजी तीन वाहनधारकांनी प्रत्येकी रुपये ९९,८००/- याप्रमाणे एकूण रुपये २,९९,४००/- इतकी दंडात्मक रक्कम चलनाद्वारे शासनजमा केल्यानंतर तसेच कसूरदार यांचेकडून वैयक्तीक जातमुचलका घेतल्यानंतर तीनही वाहने वाहनधारकांच्या ताब्यात परत देण्यात आले आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जिओ मोबाईल कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत

**(४९) ११६२१७ (२७-०३-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयात महाड-रायगड मार्गावर जिओ मोबाईल कंपनीने केबल टाकण्यासाठी साईडपट्टीवर चर खोदला असून तो चर रस्त्याला लागून खोदल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांनी उक्त कंपनीवर १९ लाख रुपयांच्या दंडाची नोटीस बजावल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन उपरोक्त दंडाची रक्कम कंपनीकडून वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
सदर कंपनीने रस्त्याच्या साईड पट्टीवर केबल टाकण्याचे काम केल्याने, रस्त्याची साईड पट्टी खराब झाल्यामुळे कंपनीस रस्त्याची साईड पट्टी खराब केलेले काम पुर्न:स्थापीत करण्याचा खर्च म्हणून रू.१९,६८,७५०/- इतकी रक्कम जमा करणेबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,महाड यांच्या दि.०७.०२.२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांच्याकडून दि.२१.०३.२०१८ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले असून, वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोटेघर (ता.जि.ठाणे) येथील जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(५०) ११६४९२ (०१-०६-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोटेघर (ता.जि.ठाणे) येथील श्री.मोहम्मद युनुस शेख यांच्या मालकीच्या भूमापन क्रमांक उपविभाग १५६/२ वर ठाणे येथील काही भूमाफियांनी अतिक्रमण करून जागा बळकावली असल्याने सदर जागेवरील अतिक्रमण हटविण्याबाबत श्री.शेख यांनी दिनांक ६ डिसेंबर, २०१७ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे लेखी तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हयात भूमाफियांनी अशाप्रकारे किती व्यक्तींच्या व शासनाच्या किती जागांवर नियमबाह्यरीत्या अतिक्रमण केले आहे,

(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने श्री.शेख यांच्या मालकीच्या भूमापन क्रमांक १५६/२ या जमिनीवर व शासनाच्या इतर जमिनीवर झालेले अतिक्रमण निष्कासीत करण्याबाबत तसेच अतिक्रमण करणाऱ्या भूमाफियांविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०६-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे गोटेघर, ता.जि.ठाणे येथील सि.स.नं.१५६/२ या जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केल्याची तक्रार सदर जमिनीच्या धारक श्री.मोहम्मद युनूस शेख यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे केली आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४५ अन्वये कारवाई करण्याबाबत उप विभागीय अधिकारी, ठाणे यांनी तहसिलदार (बिनशेती), ठाणे यांना कळविले आहे.

सदरची जमीन तक्रारदार श्री.मोहम्मद युनूस शेख व इतर यांच्या खाजगी मालकीची असून सदर जमिनीवर अतिक्रमण करुन झालेल्या अनधिकृत बांधकामासंदर्भात संबंधितांनी योग्य त्या न्यायालयात अथवा स्थानिक नियोजन प्राधिकारी यांच्याकडे दाद मागण्याबाबत तहसिलदार, ठाणे यांनी संबंधितास कळविले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.